**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३०/२०१८-१९/ 206 दिनांक: ३०.०८.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ३०(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री नेताजी राजाराम निंबाळकर<br>मु.पो. मेघमल्हार समर्थ कॉलनी<br>जत ता. जत जि. सांगली | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | |
| ३) | अतिरिक्त कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि.कं.मर्या.<br>उपविभाग जत | |

**कोरम:-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

प्रस्तुतची तक्रार अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय सांगली यांच्या दिनांक ३१.०५.२०१८ च्या आदेशाने व्यथीत होऊन, दाखल केलेली आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

थोडक्यात हकीकत अशी की, श्री नेताजी राजाराम निंबाळकर, रा.जत. घर क्र. ४ ए/२ मेघमल्हार समर्थ कॉलनी , जत ता. जत जि. सांगली येथे त्यांचे पिठाची गिरणीकरिता ५ अश्वशक्ती चे औद्योगिक विज पुरवठा चालू आहे व त्यांचा ग्राहक क्र. २७००१०७१३०४५ हा आहे. चक्कीकरिता लागणा-या थ्री फेज विद्युत पुरवठा करणेसाठी त्यांनी विद्युत वाहिनी कनव्हर्शन करिता म्हणजे १ फेज २ वायर ते ३ फेज ४ वायर करणेकरिता लागणारा खर्च ORC मध्ये त्यांचेकडून वि.प. कंपनीने २००५ मध्ये खालील प्रमाणे भरुन घेतला होता.

A) पावती क्र. २५४३९३३ दिनांक १५.०३.२००५ रु. २२,६२०/-
या भरुन घेतलेल्या रु. २२,६२०/- मध्ये खालील प्रमाणे रक्कम भरुन घेतलेली आहे.

१) CRA Rs. १५००/-
२) SD Rs. ३७५०/-
३) AB Rs. २०/-
४) CT Rs. १००/-
५) SLC Rs. २२५०/-
६) १००% ORC Rs. १५०००/-

B) Rs. ४३००/- पावती क्रमांक ६६६८६९४ दिनांक २६.०९.२५००५
१००% Additional ORC Charges Rs. ४३००/-

वितरण कंपनीने वसुल केलेला वरील प्रमाणे खर्च हा बेकायदेशीर असलेने व्याजासह परत करावा व दिनांक ३१.१०.२००५ पासून प्रत्यक्ष बिलातून परतावा चालू होईल पर्यतच्या कालावधीसाठी ७% व्याजासह परतावा मिळावा. अशी मागणी त्यांनी अतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली यांचेकडे केली.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने उभय पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेऊन आपल्या दिनांक ३१.०५.२०१८ च्या आदेशाने विज वितरण कंपनीला परिपत्रक क्र. २५०७९ दिनांक १२.१०.२०१७ नुसार औद्योगिक विज कनेक्शनसाठी घेण्यासाठी केलला खर्च परत करण्या संदर्भात योग्य ती कारवाई करावी असा आदेश पारित केला. सदर आदेशा विरुध्द तक्रारदाराने परिशिष्ट "अ" नुसार या मंचापुढे मुळ ग्रा-हाणे मांडून परतावा हा त्याचे औद्योगिक आणि घरगुती विज कनेक्शन या दोन्ही मधून परतावा करावा अशी मागणी केली.

प्रस्तुत प्रकरणाची नोटीस मिळाल्यानंतर विज वितरण कंपनीतर्फे उपकार्यकारी अभियंता म.रा.वि.कं.मर्या. उपविभाग जत यांनी आपले लेखी म्हणणे या मंचासमोर मांडून अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय सांगली यांच्या आदेशाप्रमाणे पत्र क्र. ००४८७९ दिनांक ३१.०५.२०१८ तसेच परिपत्रक क्र. २५०७९ दिनांक १२.१०.२०१७ नुसार या परिपत्रकाप्रमाणे एस.एल.सी ओआंरसी व Addl. ORC ची ग्राहकाने भरलेली रक्कम व त्यावरील ६ टक्के दराने होणारे व्याज अशी एकुण रक्कम रु. ३७,८८८.८७ पैसे इतक्या रक्कमेचा बी ८० भरण्यात आलेला असून त्याप्रमाणे ग्राहकांच्या ग्राहक क्र. २७००१०७१३०४५ या विज बिलामध्ये सदरची रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे असे प्रतिपादन केलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दिनांक २३.०८.२०१८ रोजी हया मंचासमोर घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदार तर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे व वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री संजय धर्मेश काळबांधे उपविभाग जत हे उपस्थित होते.

वि.प. कंपनीतर्फे श्री संजय धर्मेश काळबांधे यांनी त्यांचा युक्तिवाद त्यांचे लेखी कथना प्रमाणे सादर केला आहे

उभय पक्षकाराचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर व उपलब्ध कागदपत्रावरुन या मंचाच्या निष्कर्षाकरता खालील मुद्दे उपस्थित होतात.

| मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|
| तक्रारदार ग्राहकाची मागणी योग्य आहे काय ? | नाही |
| अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

**कारणे**

**मुद्दा क्रमांक १ ते २:-** प्रस्तुत प्रकरणांत या मंचासमोर तक्रारदाराची केवळ एवढीच मागणी आहे की, त्यास परतावा मिळणा-या रक्कमेचा परतावा त्याची घरगुती व औद्योगिक विज बिलातून मिळण्याचा आदेश व्हावा कारण त्याच्या विज वापराचे बिल दरमहा ५०० रुपये पेक्षा जास्त येत नाही व ती वसूल होण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. या उलट विज वितरण कंपनीतर्फे तक्रारदारास सदरचा परतावा त्याचे औद्योगिक विज ग्राहक क्र. २७००१०७१३०४५ या विज कनेक्शन मधून देण्यात आलेला आहे असे म्हणणे मांडण्यात आलेले आहे. तसेच पत्र क्र. उकाअ/अभि/जत/बी/२०८० दिनांक १६.०८.२०१८ वि.प. कंपनीच्या प्रतिनिधी श्री काळबांधे उपकार्यकारी अभियंता उपविभाग जत यांनी सुनावणी दरम्यान मंचासमोर सादर केले. याचा अर्थ असा विज वितरण कंपनीने तक्रारदारास अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशाप्रमणे देय होणा-या संपूर्ण रक्कमचे क्रेडीट तक्रारदास त्यांच्या औद्योगिक कनेक्शन मधून दिलेले आहे. असे क्रेडीट त्यास देण्यात आलेले आहे याबाबत तक्रारदाराचे कोणताही उजर दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणांतील एकूण वादाच्या मेरिटबद्दल, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशाबद्दल, कोणत्याही पक्षकाराचे काही म्हणणे दिसून येत नाही. किंबहूना सदर आदेशाचे पालन केल्याचे विज वितरण कंपनीचे म्हणणे आहे. आदेशाचे पालन कशा प्रकारे करावे हा, ज्या विरुध्द आदेश पारित झालेला आहे त्या पक्षकाराचा स्वेच्छाधिकार आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारदारास देय असणा-या रक्कमेचा कशा प्रकारे परतावा करावा याच्या काही सूचना आपल्या आदेशात केलेल्या नाहीत. अमूक एका पध्दतीने आदेशांच्या पालन करावे अशी मागणी तक्रारदार वि.प. विरुध्द करु शकत नाही .त्याला तसा कायदेशीर अधिकार नाही. तक्रारदाराची मागणी ही केवळ सोयीच्या दृष्टीने केलेली दिसते. औद्योगिक कनेक्शनचे बिल हे जादा रक्कमेचे येत असलेच पाहिजे ते घरगुती वापराच्या बिलापेक्षा कमी रक्कमेचे येते असे तक्रारदाराचे कथन नाही. जास्त रक्कमेच्या बिलामधून परताव्या रक्कमेची वसूली लवकर आणि थोंडया कालावधीत होऊ शकेल ही बाब निर्विवाद आहे त्यामुळे प्रस्तुत प्रकरणांत काही आदेश देण्याची परिस्थिती दिसत नाही. त्यामुळे तक्रारदाराची मागणी मंजूर करता येत नाही असे या मंचाचा निष्कर्ष आहे, सबब मुद्दा क्रमांक एक उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO.
महावितरण

सबब आम्ही खालील आदेश पारित करत आहोत.

## आदेश

१) प्रस्तुतची तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.
२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| ( पी.एस. पुजारी) | (पी. व्ही. खपली) | (ए.व्ही. देशपांडे) |
|---|---|---|
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण